RCS 187/2026

Exh. 11

Appendix - 1

# BEFORE THE LOK ADALAT

**HELD AT** Civil Judge Junior Division

[Organised by ________________ Authority/ ________________

Committee under Section 19, f the Legal Services Authorities Act, 1987(Central Act)

Petitioner/ Plaintiff/ Complainant :- [illegible]

Defendant / Respondent :- [illegible]

No. of Proceeding of the Jr. CJJD court/Authority/ Committee,

Present :- ________________

Name of Judicial Officer :- Smt. M. J. Gaikwad

Retired Judicial Officer :- —

Name Of Members :- (1) Smt. R. M. Gade

:- (2) ________________

## AWARD

The dispute between the parties having been referred for determination to the Lok Adalat and the Parties having compromised / settled the case / matter, the following award is passed in terms of the settlement:

As per compromise pursis.

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded.

[illegible]

Petitioner/ Plaintiff/ Complainant

Defendant/ Respondent

Judicial Officer

Member

Member

Date :- 9/05/2026.

Seal of the Authority/ Committee

## तडजोड पुरसीस

रे.मु.नं.१८७/२०२६

माळशिरस येथील मे.सिव्हील जज्ज ज्यु.डी.सो यांचे कोर्टात

श्री.शिवाजी सोमनाथ (सोमा) कर्चे ---- वादी

विरुध्द

१) धुरपाबाई (द्रोपदाबाई) सोमनाथ (सोमा) कर्चे
२) सत्यवान सोमनाथ (सोमा) कर्चे
३) लोचना विठ्ठल काळेल

} प्रतिवादी

**यात वादी प्रतिवादी तर्फे तडजोड पुरसीस येणे प्रमाणे-**

सदर कामी यात वादी व प्रतिवादीमध्ये आपसांत तडजोड होवुन सरस निरस मानाने हिस्से वेगवेगळे करुन घेतलेले आहेत ते खालील प्रमाणे-

१) **जिल्हा सोलापूर तालुका माळशिरस पैकी मौजे पिंपरी येथील मिळकतीचे वाटप खालीलप्रमाणे -**

| गट नंबर | क्षेत्र<br>हे. = आर | आकार<br>रु. = पैसे | |
|---|---|---|---|
| ४५५ | ० = ३५ | ० = २० | प्रतिवादी नं.२<br>सत्यवान सोमनाथ (सोमा) कर्चे |
| | पो.ख.० = १४ | | |
| ४४३ | ० = ०७ | ० = १० | |
| ४४७ | ० = २५ | ० = ५५ | |
| | पो.ख.० = ०२ | | |

| गट नंबर | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|
| | हे. = आर | रु. = पैसे | |
| ४९१ | १ = ३२ | ० = ६० | वादी |
| | पो.ख.० = ०९ | | शिवाजी सोमनाथ (सोमा) कर्चे |

जिल्हा सोलापूर तालुका माळशिरस पैकी मौजे पिंपरी गट नं.४२१ चे वाटप खालीलप्रमाणे -

सदरचा गट हा पुर्व-पश्चिम चालीचा असुन दक्षिणेकडुन पुर्व-पश्चिम चालीचे क्षेत्र ० हे. २० आर आकार ० रु. २० पैसे एवढे क्षेत्र प्रतिवादी नं.२ सत्यवान सोमनाथ (सोमा) कर्चे यांचे वाटणी हिश्यास दिलेले आहे. तसेच सदर गटातील पश्चिम बाजुने दक्षिण-उत्तर चालीचे प्रतिवादी नं.२ सत्यवान यांना दिलेल्या क्षेत्राच्या उत्तरेस क्षेत्र ०हे. १० आर, आकार ० रु. १५ पैसे हे क्षेत्र प्रतिवादी नं.१ धुरपाबाई (द्रोपदाबाई) सोमनाथ (सोमा) कर्चे यांचे वाटणी हिश्यास दिलेले आहे. प्रतिवादी नं.१ यांना दिलेल्या क्षेत्राच्या उत्तरेस क्षेत्र ०हे. १२ आर पो.ख.०हे. ०३ आर एवढे क्षेत्र वादी शिवाजी सोमनाथ (सोमा) कर्चे यांचे वाटणी हिश्यास दिलेले आहे.

तसेच सदर गटातील उर्वरीत राहिलेले उत्तर बाजुचे पुर्व-पश्चिम चालीचे व काही प्रमाणात दक्षिण बाजुस दक्षिण-उत्तर चालीचे क्षेत्र ० हे. १२ आर, आकार ० रु. ३० पैसे एवढे क्षेत्र प्रतिवादी नं.२ सत्यवान सोमनाथ (सोमा) कर्चे यांचे वाटणी हिश्यास दिलेले आहे. सदर गटाच्या पश्चिम बांधाने दक्षिण-उत्तर चालीचा शिंदेमळा गावरस्ता आहे. उत्तर बाजुचे प्रतिवादी नं.२ सत्यवान यांना दिलेल्या हिश्यातुन व शिवाजी यांना दिलेल्या हिश्यातुन शिंदेमळा गावरस्ता यास मिळणेसाठी उत्तर बाजुने पुर्व-पश्चिम चालीचा व पश्चिम बाजुने दक्षिण-उत्तर चालीचा गाव रस्त्यास

मिळणेसाठी १२ फुट रुंदीचा रस्ता वादी शिवाजी व प्रतिवादी नं.२ सत्यवान यांचे दोघात समाईकांत ठेवला आहे.

गट नं.४९१ मध्ये इतर अधिकारामध्ये विहीरीमध्ये सोमा व द्रोपदा यांचा हिस्सा आहे. त्यांचे नाव कमी करुन त्याठिकाणी वादी शिवाजी सोमनाथ कर्चे यांचे नांव लावणेचे आहे.

यातील प्रतिवादी नं.३ लोचना विठ्ठल काळेल यांना दावा मिळकतीत हिस्सा होता. परंतु त्यांनी तो वादी व प्रतिवादी नं.१ व २ यांना पुर्वीच स्वत:हून स्वखुशीने तोंडी आपसात सोडून दिलेला आहे. त्यामुळे त्यांना दावा मिळकतीत हिस्सा घ्यावयाचा नाही.

येणे प्रमाणे वादी व प्रतिवादी यांची आपसांत तडजोड झाली असुन सदर तडजोडी प्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी गावकामगार तलाठी मौजे कोळेगाव यांचेकडे नोंदी करुन घेणेच्या आहेत. सदर तडजोडी प्रमाणे हुकुम व्हावा.

**येणे प्रमाणे तडजोड पुरसीस असे ता.०९/०५/२०२६**

वादी तर्फे ॲड.

वादी

१)

२)

३)

प्रतिवादी तर्फे ॲड.

प्रतिवादी

सदर तडजोड पुरसीस मधील सर्व मजकूर सर्व संबंधित पक्षकारांना वाचून व समजावून सांगितला. त्यांनी तो कबुल असलेचे मान्य करुन तडजोड पुरसीसवर सहया/अंगठे आमचे समक्ष केले आहेत. तडजोड पुरसीसमध्ये खाडाखोड नाही.

वादी तर्फे ॲड.

प्रतिवादी तर्फे ॲड.



(वादी)



(प्र.नं.१)



(प्र.नं.२)



(प्र.नं.३)

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

रे.मु.नं.१८७/२०२६

## माळशिरस येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डी. यांचे कोर्टात

==================================================================

श्री.शिवाजी सोमनाथ कर्चे ---- वादी

विरुध्द

श्री.धुरपाबाई सोमनाथ कर्चे, वगैरे ---- प्रतिवादी

यात मी प्रतिवादी नं.१ धुरपाबाई सोमा कर्चे, उ.व. ७० , धंदा-शेती, रा.पिंपरी, ता.माळशिरस, जि.सोलापूर समक्ष हजर राहुन सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करते की,

सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द दावा जमिनीचे सरस निरस मानाने वाटपासाठी केला आहे. सदर दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची आपसांत तडजोड झाली आहे. माझे नाव दाव्यामध्ये प्रतिवादी नं.१ म्हणुन धुरपाबाई (द्रोपदाबाई) सोमनाथ (सोमा) कर्चे असे नमुद आहे. परंतु आधारकार्ड सदरी माझे नाव धुरपाबाई सोमनाथ कर्चे व ७/१२ सदरी द्रोपदाबाई सोमा कर्चे असे लागलेले आहे. धुरपाबाई सोमनाथ कर्चे व द्रोपदाबाई सोमा कर्चे ही दोन्ही नावे माझीच असून सदरची दोन्ही नावे असलेली मी एकच व्यक्ति आहे. तसेच पन्हाळे व कर्चे ही दोन्ही आडनावे माझीच आहेत.

येणेप्रमाणे प्रतिज्ञापत्र असे ता.~~१३/१२/२०२५~~ ०९/०५/२६

0 9 MAY 2026

ओळख

(Adv. M.M. Dhaienje)

प्रतिज्ञापत्र करणार

# <u>प्रतिज्ञालेख</u>

यात मी प्रतिवादी नं.१ धुरपाबाई सोमा कर्चे, उ.व. १०० , धंदा-शेती, रा.पिंपरी, ता.माळशिरस, जि.सोलापूर समक्ष हजर राहुन सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करते की, वरील संपूर्ण मजकूर मला वाचुन दाखविला असुन तो माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर असून त्याखाली मी माझी सही/अंगठा केला आहे.

डा.अं. श्री. धुरपाबाई सोमा कर्चे

प्रतिज्ञापत्र करणार

Solemnly affirmed before me
by Shri Dhurpabai Soma Karche
R/o Pimpari, Malshiras
who is identified by Shri Adv. M.M. Dhainje
whom I personally Know

Asstt. Supdt.
C.J.J.D. & J.M.F.C. Court
Malshiras

09 MAY 2026